Volume - 6 (2025)
Special Issue - 1 (March)

**RESEARCH HUB**
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal

ISSN
2582-9173

Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# पर्यावरणीय संतुलन व आर्थिक विकास:- एक अर्थशास्त्रीय अध्ययन

**प्रा. डॉ. अमोल गिरिधरराव आवंडकर**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
नुतन आदर्श कला,वाणिज्य व श्रीमती एम.एच
वेगड विज्ञान महाविद्यालय उमरेड जि.- नागपूर.

---

***सारांश :***

*वर्तमान काळात जगातील सर्वच देश पर्यावरणीय असंतुलनाच्या समस्येने ग्रस्त झालेले आहेत त्यामुळे जगात शाश्वत विकास म्हणजेच पर्यावरणाला संतुलित ठेवून आर्थिक विकास साध्य करणे या बाबीला अतिशय महत्त्व आले आहे म्हणूनच या संशोधन लेखाचा विषय "पर्यावरणीय संतुलन व आर्थिक विकास:- एक अर्थशास्त्रीय अध्ययन." असा घेण्यात आला आहे जेणेकरून या समस्येचे विस्तृत विवरण करून व त्यावरील उपाययोजना शोधून पर्यावरण संतुलन साध्य करून आर्थिक विकास कसा करता येईल हे अभ्यासाने यथायोग्य होईल. कोणत्याही देशाला आर्थिक विकास करण्याकरिता नैसर्गिक संसाधन मोठ्या प्रमाणात उपलब्ध असतील तर आर्थिक विकास मोठ्या प्रमाणात करता येईल परंतु या नैसर्गिक संसाधनावर आर्थिक विकास अवलंबून असल्यामुळे जर नैसर्गिक संसाधने कमी झाली किंवा संपुष्टात आली तर आर्थिक विकास देखील कमी होईल किंवा आर्थिक विकास खंडित होईल. ज्यामुळे संपूर्ण मानव जातीसमोर मोठी समस्या निर्माण होईल म्हणून केवळ भौतिक उत्पादन व उत्पन्न यावर भर न देता हे भौतिक उत्पादन व उत्पन्न निरंतर वाढते राहण्याकरिता किंवा सतत विकास होण्याकरिता पर्यावरणावर देखील भर देणे तितकेच आवश्यक आहे. कारण जोपर्यंत नैसर्गिक संसाधने मिळत जातील तोपर्यंत कोणताही देश विकास करत राहील आणि जर नैसर्गिक संसाधने मिळाली नाहीत तर मात्र कोणताही देश आर्थिक विकास करू शकणार नाही निष्कर्ष रूपाने असे म्हणता येईल की नैसर्गिक साधने निरंतर टिकून ठेवण्यासाठी पर्यावरण संतुलन साधने आवश्यक आहे. आर्थिक विकास करण्याकरिता कोणत्याही देशाला नैसर्गिक संसाधने अखंडितपणे मिळत राहतील ज्यामुळे कोणताही देश आपल्या देशातील वर्तमानकालीन पिढीच्या गरजा तर पूर्ण करेलच सोबत भविष्यकालीन पिढ्या देखील आपल्या गरजा पूर्ण करू शकतील अशा पद्धतीने पर्यावरणाला पोषक शाश्वत विकास करण्यावर भर देईल. प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय "पर्यावरणीय संतुलन व आर्थिक विकास:-एक अर्थशास्त्रीय अध्ययन"असा असून हा शोध निबंध पूर्णता द्वितीय सामग्रीवर आधारित असून विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करून लिहिण्यात आला आहे.या शोधनिबंधाची उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत. शाश्वत विकास या संकल्पनेचा अर्थ समजून घेणे,पर्यावरणीय संतुलनाचा अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करणे,आर्थिक विकास व पर्यावरण संतुलन यातील संबंधाचा अभ्यास करणे, पर्यावरणीय प्रदूषण विषयक अध्ययन करणे, पर्यावरणीय समस्यांवर उपाय सुचविणे, शाश्वत विकास निर्देशांक विषयी माहिती घेणे, भारतीय अर्थव्यवस्था व पर्यावरणीय परिस्थितीचे अध्ययन करणे, आर्थिक विकास व शाश्वत विकास यातील फरक समजून घेणे, शाश्वत विकास व पर्यावरणीय संतुलन विषयक अध्ययन करणे. प्रस्तुत शोधनिबंधाकरिता पुढील प्रमाणे गृहीतके घेण्यात आलेली आहेत. आर्थिक शाश्वत विकास पर्यावरणास पोषक*

*आहे, शाश्वत विकास मानवी विकासाला अनुकूल आहे, शाश्वत विकास भविष्यकालीन अर्थव्यवस्थेचा कणा आहे, देशातील नैसर्गिक साधन संपत्तीवर शाश्वत आर्थिक विकासाचा अनुकूल परिणाम झाला आहे. अशाप्रकारे प्रस्तुत शोधनिबंधाची उद्दिष्टे व गृहीतके वरील प्रमाणे घेण्यात आली असली तरी या उद्दिष्टे व गृहीतकांचे अध्ययन केल्यानंतर लक्षात येते की वरील सर्व गृहीतके अनुकूल सिद्ध झाली आहेत तथा सर्व गृहीतकांचा स्वीकार करण्यात आला आहे. निष्कर्ष रूपाने म्हणता येईल की वर्तमानकालीन जगात पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे म्हणून प्रत्येक देशाने व व्यक्तीने शाश्वत विकासाचे अनुकरण करून पर्यावरण संतुलित करण्याकरिता शाश्वत विकासाचा पुरस्कार करणे व संवर्धन करणे यथायोग्य होईल.*

---------------------------------------------------------------------------------------------------

**प्रस्तावना :**

प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय "पर्यावरणीय संतुलन व आर्थिक विकास:- एक अर्थशास्त्रीय अध्ययन" असा असून प्रस्तुत विषयाचा सखोल अभ्यास केल्यानंतर लक्षात येते की संपूर्ण मानव जातीकरिता पर्यावरणीय संतुलन अतिशय महत्त्वपूर्ण आहे. सोबतच देशाचा आर्थिक विकास करण्याकरिता पर्यावरणीय घटक महत्त्वपूर्ण भूमिका वटवितात ज्यामुळे कोणताही देश आर्थिक विकास करू शकतो. परंतु कोणत्याही देशाला आर्थिक विकास करण्याकरिता कच्चामाल किंवा नैसर्गिक साधन संपत्ती मोठ्या प्रमाणात लागत असते या नैसर्गिक साधन संपत्तीवरच कोणत्याही देशाचा आर्थिक विकास निर्भर असतो उदा. ज्या देशाकडे नैसर्गिक साधन संपत्ती कमी असेल तो देश कमी विकास करेल किंवा अन्य देशांवर आर्थिक विकासाकरिता निर्भर राहील. यावरून आपल्या लक्षात येते की कोणत्याही देशाला झपाट्याने आर्थिक विकास करण्याकरिता नैसर्गिक साधन संपत्ती अतिशय महत्त्वपूर्ण आहे आणि ही नैसर्गिक साधन संपत्ती आपल्याला पर्यावरणाच्या माध्यमातून उपलब्ध होते म्हणून पर्यावरण आणि आर्थिक विकास यात संतुलन साधने आवश्यक आहे. पर्यावरणामध्ये असंतुलन निर्माण झाल्यास देशाचा आर्थिक विकास खंडित होईल किंवा आर्थिक विकासात व्यत्यय निर्माण होईल म्हणून आर्थिक विकास व पर्यावरण संतुलन या दोन्ही बाबी एक सोबत राहणे आवश्यक आहेत. म्हणूनच प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय "पर्यावरणीय संतुलन व आर्थिक विकास :- एक अर्थशास्त्रीय अध्ययन" असा घेण्यात आला आहे. कोणत्याही देशाचा विकास हा केवळ भौतिकतेवर आधारित असते ज्यामुळे पर्यावरणाकडे दुर्लक्ष होते म्हणून अशा प्रकारचा आर्थिक विकास भविष्यकाळात खंडित होईल परंतु जर देशाला चिरकाल चालणारा,अखंडित आर्थिक विकास करायचा असेल तर प्रत्येक देशाला शाश्वत आर्थिक विकास करावा लागेल. शाश्वत आर्थिक विकास हा पर्यावरणाला कोणतेही प्रकारची इजा न पोहोचविता किंवा पर्यावरण संतुलन राखून पर्यावरणामध्ये कोणतेही प्रदूषण किंवा समस्या निर्माण न करता म्हणजेच पर्यावरण पोषणीय विकास होईल.शाश्वत आर्थिक विकास म्हणजेच शाश्वत आर्थिक विकासामध्ये आर्थिक विकासासोबतच पर्यावरणीय संतुलनाला देखील अत्यंत अधिक महत्त्व देण्यात येते. जगातील प्रत्येक राष्ट्रांनी आज पर्यावरणीय संतुलन राखून आर्थिक विकास करणे आवश्यक आहे ज्याकरिता शाश्वत आर्थिक विकास ही नवीन संकल्पना अर्थशास्त्रामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका वटविते.

**संशोधन पद्धती :**

पर्यावरणीय संतुलन व आर्थिक विकास एक अर्थशास्त्रीय अध्ययन या शोधनिबंधाच्या

अध्ययनाकरिता पूर्णता द्वितीय सामग्रीचा वापर करण्यात आला आहे तथा या शोधनिबंधाच्या लिखाणा करिता विश्लेषणात्मक अध्ययन पद्धतीचा वापर करून निष्कर्ष काढण्यात आले आहेत द्वितीय सामग्रीमध्ये विविध ग्रंथ किंवा पुस्तके,मासिके,वर्तमानपत्रे, शासकीय व निमशासकीय अहवाल, कागदपत्रे व इंटरनेटचा वापर करून विविध सामग्री ह्या शोधनिबंधाच्या लिखाणाकरिता वापरण्यात आलेली आहे. कोणत्याही शोधनिबंधाचे लिखाण करण्याकरिता शोधनिबंधाचे उद्दिष्टे व गृहिते घेणे क्रमप्राप्त ठरते. प्रस्तुत शोधनिबंधाची उद्दिष्टे व गृहीतके खालील प्रमाणे घेण्यात आलेली आहेत.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :**

प्रस्तुत शोधनिबंधाची अनेक उद्दिष्टे असली तरी काही महत्त्वपूर्ण उद्दिष्टे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

1. शाश्वत विकास या संकल्पनेचा अर्थ समजून घेणे.
2. पर्यावरणीय संतुलनाचा अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करणे.
3. आर्थिक विकास व पर्यावरण संतुलन यातील संबंधाचा अभ्यास करणे
4. पर्यावरणीय प्रदूषण विषयक अध्ययन करणे.
5. पर्यावरणीय समस्यांवर उपाय सुचविणे
6. शाश्वत विकास निर्देशांक विषयी माहिती घेणे
7. भारतीय अर्थव्यवस्था व पर्यावरणीय परिस्थितीचे अध्ययन करणे.
8. आर्थिक विकास व शाश्वत विकास यातील फरक समजून घेणे.
9. शाश्वत विकास व पर्यावरणीय संतुलन विषयक अध्ययन करणे.

**शोधनिबंधाची गृहितके :**

प्रस्तुत शोधनिबंधाची महत्त्वपूर्ण गृहीतके पुढीलप्रमाणे आहेत.

1) आर्थिक शाश्वत विकास पर्यावरणास पोषक आहे.
2) शाश्वत विकास मानवी जीवनाला अनुकूल आहे.
3) शाश्वत विकास भविष्यकालीन अर्थव्यवस्थेचा कणा आहे.
4) देशातील नैसर्गिक साधन संपत्तीवर शाश्वत आर्थिक विकासाचा अनुकूल परिणाम झाला आहे.

**पर्यावरणीय संतुलन व शाश्वत आर्थिक विकास :**

The World Commission of Environment And Development (WCED;1987;43) यांच्या मते शाश्वत विकासाची व्याख्या पुढील प्रमाणे केलेली आहे. "वर्तमानकालीन पिढीच्या गरजा पूर्ण करून भविष्यकालीन पिढ्यांच्या गरजा पूर्ण होतील असा विकास म्हणजे शाश्वत विकास होय." या व्याख्येवरून आपणास शाश्वत विकासाचा नेमका अर्थ काय आहे हे समजण्यास मदत होते. व्याख्येमध्ये स्पष्ट केल्यानुसार शाश्वत विकासामध्ये वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करणे अपेक्षित आहे तसेच भविष्यकालीन पिढीच्या गरजा देखील भविष्यात पूर्ण झाल्या पाहिजेत असे स्पष्ट दिसून येते यावरून निदर्शनास येते की गरजा पूर्ण करण्याकरिता

ज्या नैसर्गिक संसाधनांचा वापर करायचा आहे अशा पद्धतीने केला पाहिजे जेणेकरून वर्तमान आणि भविष्यकालीन पिढ्यांच्या गरजा पूर्ण होतील म्हणजेच कोणत्याही परिस्थितीमध्ये नैसर्गिक संसाधने समाप्त होता कामा नये किंवा सर्वांकरिता नैसर्गिक संसाधने उपलब्ध राहतीलच हे शाश्वत विकासाचे मुख्य तत्व आहे हे आपणास व्याख्येवरून निदर्शनास येते हे तेव्हाच होवू शकते जेव्हा पर्यावरणामध्ये संतुलन प्रस्थापित होईल पर्यावरणामध्ये असंतुलन, समस्या,अडचणी निर्माण झाल्यास शाश्वत विकास साध्य करता येणार नाही. निष्कर्ष रूपाने स्पष्ट होते की पर्यावरण संतुलन झाल्याशिवाय शाश्वत विकास करणे शक्य होणार नाही म्हणूनच शाश्वत विकास हा पूर्णतः पर्यावरण संतुलनावर निर्भर आहे असे निदर्शनास येते.बार्तेलमुस (1997-388) यांच्या मते "शाश्वत विकास हा विकास कार्यक्रमांचा असा एक संच आहे की जो दीर्घकालीन नैसर्गिक संसाधन क्षमता, पर्यावरणीय गुणवत्तेचे मापदंड आणि सामाजिक समता यांच्यावर विपरीत परिणाम न करता मानवी गरजांच्या पूर्ततेचे उद्दिष्ट पूर्ण करते." बार्तेलमुस यांच्या शाश्वत विकासाच्या व्याख्येवरून स्पष्ट होते की शाश्वत विकासात दीर्घकाळपर्यंत नैसर्गिक संसाधने टिकून राहण्यावर भर दिला जातो म्हणजेच नैसर्गिक संसाधने कधीही समाप्त होता कामा नये एवढेच नव्हे तर पर्यावरणीय गुणवत्ता देखील टिकून राहणे अनिवार्य आहे. पर्यावरणीय गुणवत्तेमध्ये कोणत्याही प्रकारची तळजोळ नको. शाश्वत विकासामध्ये सामाजिक समतेवर देखील भर देण्यात आला आहे याचाच अर्थ असा की नैसर्गिक संसाधनावर सर्वांचा समान अधिकार आहे सर्वांना आपल्या गरजा पूर्ण करण्याकरिता नैसर्गिक संसाधने वापरण्याचा समान अधिकार आहे. अशाप्रकारे शाश्वत विकास व पर्यावरणीय संतुलन यांचा संबंध अतुट आहे.

**विविध निर्देशांक व शाश्वत विकास :**

विविध विविध शाश्वत विकास निर्देशांकांच्या माध्यमातून आपण तपासून किंवा पडताळून पाहू शकतो की एखादा देश जो विकास करीत आहे तो शाश्वत विकास आहे किंवा नाही साधारणता शाश्वत विकास पडताळण्याकरिता शाश्वत विकास निर्देशांकांचे चार भागात वर्गीकरण करण्यात येते. हे निर्देशांक खालील प्रमाणे आहेत.

अ) **अर्थविषयक :** एखाद्या देशाचा आर्थिक विकास होत असतांना शाश्वत आर्थिक विकास आहे किंवा नाही हे या अर्थविषयक शाश्वत विकास निर्देशांक मध्ये तपासून पाहिले जाते. देशाची आर्थिक स्वावलंबन, ऊर्जेचा वापर, उपभोग, उत्पादन पद्धती, अपव्यय व्यवस्थापन, वाहतूक, खनन इत्यादी च्या निर्देशांकाच्या माध्यमातून कोणत्याही देशाच्या शाश्वत विकासाची पडताळणी केली जाऊ शकते.

ब) **संस्थाविषयक** : शाश्वत विकासाची संकल्पना ही समतेच्या तत्त्वाचा स्वीकार करते तसेच ही संकल्पना सर्वसमावेशक आहे. सहकार तत्व आणि कायदेशीर चौकट, नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन,लोकांना संस्थात्मक सहभाग, विज्ञान आणि तंत्रज्ञान,लोक जागृती आणि माहिती इत्यादी द्वारे समाजाची संस्थात्मक बांधणी करत असतांना या निर्देशांकांचा आधार घेतला जातो.

क) **समाज विषयक :** समाजाच्या गरजांचा विचार करता यामध्ये विशेष रूपाने आरोग्य, पाणीपुरवठा, स्वच्छता, घरबांधणी, सांस्कृतिक वारसा, गरिबी निर्मूलन, शिक्षण आणि रोजगार, आर्थिक समानता,

गुन्हेगारी उच्चाटन, लोकसंख्या विषयक समस्या, सामाजिक मूल्य, नैतिक मूल्य, महिला-पुरुष समानता, महिला सुरक्षा व स्थान इत्यादींच्या माध्यमातून समाज विषयक निर्देशांकद्वारे देशामध्ये विविध धोरणे ठरवून नियोजन केले जाते. शाश्वत विकास करण्यासाठी वरील सर्व घटकांद्वारे निर्देशांक काढण्यात येते याद्वारेच ठरविले जाते की देशात समाज विषयक शाश्वत विकास होत आहे किंवा नाही.

ड) **पर्यावरण विषयक :** शाश्वत विकासाचा पर्यावरण कणा आहे. पर्यावरण संतुलन हेच शाश्वत विकासाचे मुख्य उद्दिष्ट असते. देशामध्ये शुद्ध पाणी, भूगर्भातील पाणी, कृषी, सुरक्षित अन्नपुरवठा, जैवतंत्रज्ञान, किनारी भूभाग, सागरी पर्यावरण, हवा, वातावरणातील बदल, शाश्वत पर्यटन, जमिनीच्या वापरातील बदल, पिकांमधील बदल इत्यादी घटकांच्या माध्यमातून पर्यावरण विषयक निर्देशांक तयार करून मापन केले जाते ज्याद्वारे समजण्यास मदत होते की देशात शाश्वत विकास होत आहे किंवा नाही. हे मापन झाल्यानंतर पर्यावरण संतुलन साधण्याकरिता आणि त्याद्वारे शाश्वत विकास घडवून आणण्याकरिता विविध निर्णय घेतले जातात.

कोणत्याही देशांमध्ये शाश्वत विकास किती प्रमाणात होत आहे हे तपासणी वरील सर्व म्हणजेच अर्थविषयक संस्था विषयक समाज विषयक व पर्यावरण विषयक विविध निर्देशांकांद्वारे व अन्य निर्देशांकांच्या सहाय्याने केली जाते. अन्य निर्देशांकामध्ये बेरोजगारी दर, लोकसंख्या वृद्धीदर, दरडोई उत्पन्न, जमिनीचा पर्याप्त वापर, खताचा वापर, हवा प्रदूषण, विजेचा वार्षिक उपभोग इत्यादी आहेत. ज्याद्वारे देखील शाश्वत विकासाची पडताळणी केली जाते आणि आपणास सहज लक्षात येते की शाश्वत विकासाच्या मार्गावर देश आहे किंवा नाही.

**पर्यावरणीय अर्थशास्त्रीय विश्लेषण :**

मनुष्य आणि पर्यावरणाचा घनिष्ठ संबंध आहे. उदाहरणार्थ मनुष्याच्या मूलभूत गरजा अन्न,वस्त्र,निवारा ह्या पर्यावरणाच्या माध्यमातूनच पूर्ण होतात. एवढेच नव्हे तर पृथ्वीवरील सर्व सजीवांना पर्यावरणाचा आधार घेऊनच जीवन जगावे लागते.पशु-पक्षी व अन्य जीव यांचा जन्म,वाढ व विकासासाठी पोषणीय निसर्गाची किंवा संतुलित पर्यावरणाची आवश्यकता असते अन्यथा त्यांच्या जीवनावर विपरीत परिणाम होऊन त्यांचे जीवन धोक्यात येऊ शकते. आधुनिक काळातील साम्राज्यवाद व औद्योगीकरणामुळे पर्यावरणामध्ये असंतुलन निर्माण होत आहे ज्यामुळे जीवनमान खालावत जात आहे. आपल्या भारतासारख्या किंवा चीन सारख्या देशांमध्ये प्रचंड लोकसंख्या असल्याने व गरीबी असल्याने ही समस्या अधिक विघातक रूप धारण करत आहे. विविध कारणांमुळे जगात पर्यावरणात असंतुलन निर्माण होऊन पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्याचे विविध वृत्तपत्रे, व्याख्याने, इत्यादींच्या माध्यमातून वाचण्यात आणि ऐकण्यात येते. पार्क सी. यांनी पर्यावरणाची व्याख्या केली आहे त्यांच्या "विशिष्ट वेळी, विशिष्ट ठिकाणी मानवाला वेढणारी जी नैसर्गिक किंवा सांस्कृतिक परिस्थितीची एकात्मिक अवस्था असते तिलाच पर्यावरण म्हणतात." या व्याख्यावरून स्पष्ट होते की मानवाच्या अवतीभोवतीची सर्व परिस्थिती चा समावेश पर्यावरणामध्ये केला जातो ज्यामुळे पर्यावरण ही संकल्पना अधिक व्यापक असल्याचे लक्षात येते. डडले स्टॅम्प यांच्यानुसार " पर्यावरण प्रभावाचा असा एकत्रित परिणाम आहे जो एखाद्या जिवाचा विकास आणि निसर्गाला परावर्तित किंवा निर्धारित करीत असतो." डॉ. कुलकर्णी यांच्यानुसार "

मानवी जीवन अनुभवत असलेल्या नैसर्गिक, भौगोलिक आणि जैविक परिस्थितीची गोळा बेरीज म्हणजे पर्यावरण होय." या व्याख्यावरून निदर्शनात येते की वातावरण व अवती-भोवतीची परिस्थिती म्हणजे पर्यावरण होय. पर्यावरणामध्ये सर्वच घटकांचा समावेश होतो. उदाहरणार्थ माती, जल, वायु, वनस्पती व सूक्ष्मजीव इत्यादी सर्वच घटकांचा समावेश पर्यावरणामध्ये होतो. यासोबतच पर्यावरणाचा महत्त्वाचा एक भाग म्हणजे लोकसंख्या, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक सर्वच चल अचल सर्वच घटकांचा पर्यावरणात समावेश होतो.

**अ) अर्थव्यवस्था व पर्यावरण :**

पर्यावरणामध्ये निर्माण झालेल्या असंतुलनाचे अध्ययन करण्याकरिता व पर्यावरण संतुलन किंवा पोषणीय पर्यावरण निर्माण करण्याकरिता आपणास सर्वप्रथम अर्थव्यवस्था व पर्यावरण यांच्यातील परस्पर संबंध अभ्यासणे आवश्यक आहे. एखाद्या देशाचा आर्थिक विकास कसा होत आहे हे समजून घेऊन आपणास शाश्वत विकास कसा करावा हे समजण्यास मदत होईल. अर्थव्यवस्था ज्यामध्ये आर्थिक ,सामाजिक ,संस्थात्मक ,कायदेशीर ,तंत्रज्ञान युक्त व्यवस्थांचा समुच्चय असतो यातूनच समाजातील व्यक्ती त्यांचे भौतिक व आध्यात्मिक कल्याण साधण्याचा व वाढविण्याचा प्रयत्न करत असतात. अर्थव्यवस्थेची दोन प्राथमिक स्वरूपाची कार्य असतात त्यामध्ये एक उपभोग व दुसरा म्हणजे उत्पादन. कोणतीही अर्थव्यवस्था ही तिच्या भोवती असणाऱ्या पर्यावरणाशी निगडित असते. या दोन्ही बाबी एकमेकांवर अवलंबून असतात आणि त्यांच्यात आंतरक्रिया घडत असतात. नैसर्गिक पर्यावरणात जी नैसर्गिक संसाधने असतात त्यातून मानवी जीवनासाठी आवश्यक असणाऱ्या अनेक वस्तू व सेवा आणि सुविधा पुरविल्या जातात याशिवाय नैसर्गिक पर्यावरण हे आर्थिक वृद्धीच्या प्रक्रियेत महत्त्वपूर्ण भूमिका किंवा कार्य पार पाडत असते. त्यातील प्रमुख दोन कार्य म्हणजेच 1) उत्पादन प्रक्रियेसाठी आवश्यक असणाऱ्या आदानाचा पुरवठा करणे. 2) उत्पादन प्रक्रिया तयार होणारे टाकाऊ पदार्थ किंवा शिल्लक पदार्थ यांना सामावून घेणे. आर्थिक व्यवहारांमुळे मोठ्या प्रमाणात पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे आणि जोपर्यंत पर्यावरणीय संसाधनांचा पुरवठा मुबलक प्रमाणात होतो तोपर्यंत पर्यावरणीय समस्या सामाजिक स्वरूपाच्या असतात परंतु जेव्हा पर्यावरणीय वस्तूंचे रूपांतर आर्थिक वस्तूंमध्ये झाले तेव्हा अर्थशास्त्रीय तत्वाच्या आधारे पर्यावरणीय समस्या सोडविणे आवश्यक झाले आहे.

**ब) पर्यावरणीय प्रदूषण व नियंत्रण :**

वर्तमान काळात पर्यावरणाचा ऱ्हास मोठ्या प्रमाणात झाला आहे. ज्यामुळे पर्यावरणात वेगवेगळे प्रदूषण झालेले दिसून येतात.पर्यावरणातील प्रदूषण विषयी केनेड बिल्डिंग म्हणतात की "आपण एका प्रदूषित ओरबोरडलेल्या ग्रहावर राहत आहोत.ज्यामुळे पर्यावरणातील संसाधने केवळ कमी झाले असे नसून पर्यावरणाचे प्रदूषण झाले आहे." यावरून आपणास पर्यावरणाची दुर्गती झाल्याचे लक्षात येते. अनेक पर्यावरणीय समस्यांचे मूळ हे मानवाचा निसर्गातील वाढता हस्तक्षेप हेच आहे. ज्यामुळे पाणी, हवा, ध्वनी इत्यादी प्रदूषणाच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. आता तर पर्यावरणीय समस्या ही अर्थशास्त्रीय समस्या देखील झाली आहे. पर्यावरणीय प्रदूषण दूर करण्याकरता प्रदूषणाच्या विविध बाबींची योग्य माहिती जनजागृतीद्वारे सर्वांना होणे आवश्यक आहे पर्यावरणाला हानी पोहोचविणारी किंवा पर्यावरणाला मारक उदाहरणार्थ प्लास्टिकचा कचरा, मलमूत्र व त्याज्य

पदार्थ ,कारखान्यातील टाकाऊ पदार्थ ,रसायने इत्यादींवर प्रक्रिया करून त्यांचे योग्य नियोजन करणे आवश्यक झाले आहे. आपल्या अवती-भवती असणाऱ्या पर्यावरणाशी आपला रोजचा जवळचा संबंध येतोच पर्यावरणाशिवाय कोणीही जगू शकत.तलाव,वन्यजीव,भूभाग,जमीन, पाणी,जंगले,खनिजे, वनस्पती, हवामान स्थैर्य,ओझानचा स्तर इत्यादींचे संरक्षण करणे आवश्यक ठरते.

मनुष्याला ऑक्सिजन हे पर्यावरणामधून मिळत असते पाणी,अन्न इत्यादी मनुष्याकरिता पर्यावरणातूनच उपलब्ध होते म्हणून मनुष्य करिता पर्यावरणाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. परंतु हे देखील सत्य आहे की मनुष्याच्या पर्यावरणातील अतिरिक्त हस्तक्षेपामुळे पर्यावरणात असंतुलन निर्माण झाले असून आता मात्र पर्यावरण संरक्षण व संवर्धनाची गरज निर्माण झाली आहे.

**आर्थिक विकास, आर्थिक वृद्धी व शाश्वत विकास :**

संपूर्ण जगात सर्वच देशांमध्ये प्रगतीची स्पर्धा लागली आहे. विकसित देश असो किंवा अविकसित देश प्रत्येक देश प्रगती करिता मोठ्या प्रमाणात प्रयत्नशील आहेत. देशाची झपाट्याने प्रगती करण्याकरिता विकसित देश देशातील नैसर्गिक साधनसामुग्रीचा मोठ्या प्रमाणात अवाढव्य वापर करतात आणि त्याद्वारे राष्ट्रीय उत्पन्न,उत्पादन,रोजगार इत्यादींमध्ये वाढ करण्याचा प्रयत्न करतात. यालाच आर्थिक वृद्धी म्हटले जाते. ज्यामुळे देशात मात्रात्मक वाढ घडून येते. परंतु शाश्वत विकास ही संकल्पना आर्थिक वृद्धि पेक्षाही व्यापक आहे. कारण शाश्वत विकासामध्ये मात्रात्मक बदलासोबतच गुणात्मक बदल देखील आवश्यक असतात.एवढेच नव्हे तर आर्थिक वृद्धी चिरकाल किंवा दीर्घकाळ टिकणारी नसते. कारण यामध्ये नैसर्गिक संसाधनांचा अवाढव्य वापर केला जातो परंतु पर्यावरणीय संतुलनाकडे दुर्लक्ष केले जाते आणि शाश्वत विकासामध्ये मात्र नैसर्गिक संसाधनांच्या संवर्धनाचा विचार केला जातो आणि त्यावर विशेष लक्ष दिल्या जाते. ज्यामुळे नैसर्गिक साधने समाप्त होत नाहीत व आर्थिक विकास शाश्वत स्वरूपाचा होतो. जो दीर्घकाळपर्यंत निरंतर सुरू राहतो.

आर्थिक विकास ही संकल्पना आर्थिक वृद्धीपेक्षा व्यापक आहे. कारण आर्थिक विकासामध्ये मात्रात्मक व गुणात्मक अशा दोन्ही बदलांवर भर देण्यात येतो. परंतु आर्थिक विकासापेक्षाही शाश्वत विकास ही संकल्पना अधिक व्यापक आहे कारण शाश्वत विकासामध्ये अर्थव्यवस्थेतील मात्रात्मक व गुणात्मक बदलांसोबतच पर्यावरणीय संतुलनावर भर दिला जातो. ज्यामुळे शाश्वत विकास निरंतर किंवा दीर्घकाळ चालू राहतो परंतु त्या तुलनेत आर्थिक वृद्धी किंवा आर्थिक विकास दीर्घकाळपर्यंत किंवा निरंतर सुरू राहीलच याची शाश्वती नसते.

**निष्कर्ष :**

प्रस्तुत निबंधाचा विषय पर्यावरणीय संतुलन व आर्थिक विकास एक अर्थशास्त्रीय अध्ययन असा असून या शोधनिबंधाच्या अध्ययनद्वारे प्राप्त परिणामावरून निदर्शनास येते की प्रस्तुत शोधनिबंधाकरता घेण्यात आलेली सर्व गृहीतके अनुकूल सिद्ध झाली आहेत. त्यामुळे या गृहितकांचा स्वीकार करण्यात येत आहे. प्रस्तुत शोधनिबंधाकरिता पुढील प्रमाणे गृहीतके घेण्यात आलेली आहेत. आर्थिक शाश्वत विकास पर्यावरणास पोषक आहे, शाश्वत विकास मानवी विकासाला अनुकूल आहे, शाश्वत विकास भविष्यकालीन अर्थव्यवस्थेचा कणा आहे. देशातील नैसर्गिक साधन संपत्तीवर शाश्वत आर्थिक विकासाचा अनुकूल परिणाम झाला आहे. अशाप्रकारे

प्रस्तुत शोधनिबंधाची वरील गृहीतकांचे अध्ययन केल्यानंतर लक्षात येते की वरील सर्व गृहीतके अनुकूल सिद्ध झाली आहेत तथा सर्व गृहीतकांचा स्वीकार करण्यात आला आहे. निष्कर्ष रूपाने म्हणता येईल की वर्तमानकालीन जगात पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे म्हणून प्रत्येक देशाने व व्यक्तीने शाश्वत विकासाचे अनुकरण करून पर्यावरण संतुलित करण्याकरिता शाश्वत विकासाचा पुरस्कार करणे व संवर्धन करणे यथायोग्य होईल.

**संदर्भ सूची :**


- शास्त्री सुधाकर :- भारतीय अर्थव्यवस्था :- विश्व पब्लिशर्स कंपनी नागपूर.
- बोधनकर सुधीर :- सामाजिक लेखांकन पद्धती :- साईनाथ प्रकाशन नागपूर.
- सिंह कटार :- पर्यावरणाचे अर्थशास्त्र :- विद्या बुक पब्लिशर्स औरंगाबाद.
- झिंगन बी. के. :- पर्यावरणाचे अर्थशास्त्र :- SAGE पब्लिशर्स नई दिल्ली.
- दत्त- सुंदरम :- भारतीय अर्थव्यवस्था:- एस. चंद अँड कंपनी लि. नई दिल्ली.
- पुरोहित वसुधा :- पर्यावरणाचे अर्थशास्त्र :- विद्या बुक पब्लिशर्स , औरंगाबाद
- इंटरनेट WWW. Environmental Economics.